# आठव्या अखिल भारतीय पोलीस कमांडो स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस कमांडो संघाची नेत्रदिपक कामगिरी

आठव्या अखिल भारतीय पोलीस कमांडो स्पर्धा - 2017 चे आयोजन दि. 15 ते 20 जानेवारी 2018 दरम्यान हरियाणा, मनेसर येथील राष्ट्रीय सुरक्षा दलाचे (NSG) ट्रेनिंग सेंटर येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेत राष्ट्रीय सुरक्षा दल (NSG) तसेच इतर 7 केंद्रिय पोलीस संघटना व 17 राज्य पोलीस संघ अशा एकूण 25 संघामधील 600 हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या राष्ट्रीय स्तरावरील कमांडो स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस कमांडो संघाने दैदिप्यमान यशाची पुनरावृत्ती करत स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शनाद्वारे संघभावना, नेतृत्व व सामरिक कौशल्याच्या जोरावर नेत्रदिपक कामगिरी करुन तृतीय क्रमांकाच्या चषकावर महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव कोरले आहे.

आठव्या अखिल भारतीय पोलीस कमांडो स्पर्धा - 2017 मध्ये महाराष्ट्र पोलीस कमांडो संघाने **तृतीय क्रमांकासह** राष्ट्रीय पातळीवरील **बेस्ट स्टेट पोलीस कमांडो टिम** हा चषक प्राप्त केला आहे. त्याचप्रमाणे सदर स्पर्धेतील **बेस्ट पोलीस कमांडो टिम इन स्मॉल टिम ऑपरेशन (STO -II)** या प्रकारात प्रथम क्रमांक तर सदरच्या पोलीस कमांडो स्पर्धेमध्ये प्रथमच समावेश करण्यात आलेल्या स्नायपर शुटींग स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस संघाच्या वतीने सहभागी झालेल्या फोर्स वन पथकाच्या संघाने **उपविजेते पदाचा पुरस्कार** प्राप्त केला आहे. विशेष म्हणजे सदर महाराष्ट्र पोलीस स्नायपर संघामधील कमांडोंनी **ऑल ओव्हर बेस्ट स्नायपर** हा पुरस्कार देखील प्राप्त केला आहे.

या स्पर्धेचा समारोप समारंभ शनिवार दिनांक 20 जानेवारी रोजी मनेसर येथे पार पडला. सदर समारोप समारंभादरम्यान श्री. सुखविंदर सिंह, विशेष पोलीस महानिरीक्षक,फोर्स वन व महाराष्ट्र पोलीस संघाचे संघनायक पोउपनि. श्री. उत्कर्ष पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस कमांडो संघाच्या वतीने समारंभाचे प्रमुख पाहुणे केंद्रिय गृहमंत्री मा. राजनाथ सिंह यांच्या हस्ते वरील चषक स्विकारले.

***

# COMMENDABLE PERFORMANCE OF MAHARASHTRA STATE POLICE TEAM IN 8$^{TH}$ ALL INDIA POLICE COMMANDO COMPETITION

8$^{th}$ All India Police Commando Competition – 2017 was held from 15$^{th}$ January 2018 to 20$^{th}$ January 2018 at National Security Guards training centre, Manesar, Haryana. Total 25 teams including teams from NSG, Central paramilitary forces and State Police participated in the competition.

Maharashtra State Police team ranked third in the competition and won following trophies/Medals

1) Hardliners Trophy (Overall 3$^{rd}$).
2) Best State Police Commando Team Trophy.
3) Best Police Commando team in Small Team Operation II Trophy.
4) Silver medal in Sniper Shooting Competition.
5) Best Sniper det (Gold medal).

* * *


NSG
ALL INDIA POLICE COMMANDO COMPETITION
CHAKRAVYUH (URBAN)
STD-II




GUARD


NSG
COMMANDO TEAM
JAYALALITHAA



